नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 17/04/2020 (शुक्रवार)
(दुपार)

## अवैध गावठी मोहाफुल दारू अड्ड्यात धाड

पो.स्टे. उमरेड :- दिनांक 16/04/2020 रोजी उमरेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा राजुरवाडी शिवार, दहेगाव शिवार येथे काही इसम हे दुचाकीने मोहाफुल गावठी दारूची वाहतुक व अवैधरीत्या मोहाफुल दारूची निर्मिती करून त्याची विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून उमरेड पोलीसांनी घटनास्थळी नाकाबंदी करून दारूबाबत प्रोव्हीशन रेड केली असता राजुरवाडी शिवार येथे एक केस केली. तसेच दहेगाव शिवार येथे 8 केसेस करण्यात आल्या. असे एकुण 9 केसेस मध्ये 1 आरोपी अटक असून घटनास्थळी 175 लि मोहा दारू एकूण 2400 लिटर मोहाफूल सडवा व 1 मोटरसायकल किं. 2,42,400/- रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पो. स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री विलास काळे, सपोनि डोर्लीकर, मसपोनि मटाले, सफौ हटवार, पोहवा मारोती राऊत, प्रफुल माहुरे, प्रशांत अहिरवार, अजित टाकुर, पोलिस नाईक रूपेश महादुले, मनोज वाघ, हरिष यंगलवार, विठ्ठल तित्तरमारे, आशिष खेडे, पोलिस शिपाई संग्राम चाचेरे, बाबुसिंग राटोड, प्रमोद पडोले, मेहमुद पठाण यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.

# पोलीस स्टेशन उमरेड नागपूर (ग्रामीण), ची जुगार अडयावर धाड

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 5 किमी अंतरावर मोहपा शिवार, उमरेड येथे दिनांक 16/04/2020 चे 15.30 ते 16.00 वा. दरम्यान उमरेड पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम वरील नमुद घटनास्थळी मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन उमरेड पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून छापा धातला असता आरोपी नामे – 1) विजय बळीराम खवास वय 36 2) रंजन देविदास रायपुरे वय 27 3) प्रशांत उरकुडा सेलोटे वय 40 तिन्ही रा. कावरापेठ उमेरड 4) अमोल मोतीरामजी गावतुरे वय 25 रा बुधवारी पेठ उमरेड 5) हिरो होन्डा स्पेलंडर मोसा कं. एमएच 40 बीएक्स 8245 चा चालक 6) एमएच–40/बीबी– 1248 क्रमांकाच्या याम्हा मोटरसायकलचा चालक वरील सर्व आरोपी हे एका झाडा खाली बसुन तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन 52 तासपत्ते, नगदी 590/– रू., 02 दुचाकी वाहन व एक मोबाईल असा एकुण 71,610/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी उमरेड पोलीसांनी पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार जयसिंगपुरे 8551862741 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर